# पोलीस आयुक्तालय
## मिरा-भाईंदर,वसई -विरार

सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन,मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७
Email ID- dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.- सु.शा./ड्रोन/मनाई आदेश/२०२२ - १०३५ दिनांक :-२५/०७/२०२२

वाचले :- १. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ यांचेकडील पत्र क्रमांक पो.उप.आयुक्त/परि-०१/गोपनीय/ CRPC-144/३८३६. दिनांक २१/०७/२०२२.
२. पोलीस उप आयुक्त परिमंडळ -२ यांचेडील पत्र क्रमांक पोउआ परि-२/ CRPC-144/५४८५/२०२२ दिनांक २२/०७/२०२२.
३. पोलीस उप आयुक्त परिमंडळ- ३ यांचेडील पत्र क्रमांक पोउआ परि-३ विरार/ CRPC-144/ २५७८ /२०२२ दि. २२/०७/२०२२.
४. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) प्रमाणे.

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (२) प्रमाणे मनाई आदेश.**

**ज्याअर्थी,** मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडुन Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft च्या सहाय्याने हल्ला करुन मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ज्याअर्थी,** मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मर्मस्थळे व संवेदनशिल व संरक्षीत ठिकाणांचे दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडुन Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles इ.च्या सहाय्याने निरीक्षण व रेकी करुन घातपाती कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ज्याअर्थी,** मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तथा संरक्षणाच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles यांचेवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधकात्मक निर्बंध घालणे गरजेचे आहे.

**त्याअर्थी, मी विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात "Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles "ज्यामुळे मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता आहे अशा "Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles " चा वापर यावर मनाई करीत आहे. मिरा-

भाईंदर,वसई-विरार पोलीसांकडुन करण्यात येण-या हवाई सर्वेक्षणास व मा.पोलीस आयुक्त यांचेकडुन विशेष परवानगीने करण्यात येणा-या वापरास सदर मनाई आदेशातील तरतुदी लागु असणार नाहीत.

जो कोणी सदर मनाई आदेशाचा भंग करेल तो इसम भा.दं.वि.स कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच मिरा -भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रती स्थानिक वृत्त पत्रातुन प्रसिद्ध करावा. सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, संबधित पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर आदेशाचा कालावधी हा **दिनांक २६/०७/२०२२ रोजी ००.०१ पासुन ते दिनांक २२/०९/२०२२ रोजी २४.०० वाजे पावेतो** लागु राहील.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २५/०७/२०२२ रोजी दिलेला आहे.

(विजयकांत सागर)
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईदर,वसई-विरार.

प्रत :-

१) मा.अपर मुख्य सचिव गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना सविनय सादर.
२) मा पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई. यांना सविनय सादर.
३) मा.पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि. यांना सविनय सादर.
४) मा.अपर पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि. यांना सविनय सादर.
५) मा.जिल्हाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी,ठाणे, पालघर यांना सविनय सादर
६) जिल्हा प्रसिद्ध अधिकारी ठाणे, पालघर यांना बातमी मधुन प्रसिद्धीसाठी.
७) सर्व परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त मि.भा.व.वि.
८) सर्व सहायक पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.
९) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी,मि.भा.व.वि.
१०) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती, मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई. यांचे कडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
११) नस्तीकरिता.